# प्रकरण तिसरे

## " धग " या कादंबरीची प्रादेशिकता

## प्रास्ताविक

१९५० नंतर मराठी साहित्यात नवा कालखंड निर्माण झाला. त्याचा परिणाम प्रादेशिक कादंबरीवरही झाला. उद्धव ज. शेळके यांची " धग " १९६० ही कादंबरी प्रादेशिक कादंबरी म्हणून निर्देशाली जाते. मराठी विश्व-कोशात " धग " चा निर्देश प्रादेशिक कादंबरी म्हणून केलेला आहे.

विदर्भाच्या प्रदेशातील एक ठरावीक भाग हिंगणघाट, तळेगांव, मोझरी येथे " धग " चे कथानक घडते. कादंबरीतील महादेव, कासम, सकीना, भीमा, नामा आणि कौतिक ही पात्रे आणि तेथील प्रदेश यामध्ये अवास्तव असे कांही नाही. व-हाड मुलखात घडणा-या या कादंबरीत आवश्यक तेवढाच मर्यादित भूभाग आलेला आहे. प्रादेशिक बोली हा त्या प्रदेशातील लोकजीवनाचाच एक भाग असतो. तिच्यातून तेथील लोकजीवन व्यक्त होत असते. निवेदन प्रमाण भाषेतून असले तरी संवादातून अर्थवाही अशा व-हाडी बोलीभाषेचे उपयोजन लेखकाने केलेले आहे.

विदर्भातल्या प्रदेश वैशिष्टयांची भक्कम बैठक " धग " ला लाभलेली आहे. तेथील निसर्ग, तेथील माणसे, त्यांची

स्वभाववैशिष्टये, त्यांच्या समजूती, त्यांच्या चालीरीती त्यांची मनोवृत्ती, त्यांचे पेहराव, त्यांची दैवते, त्या दैवतांवरील श्रध्दा, दैवतांचे उत्सव, तेथील अंधश्रध्दा, तेथील नीती-अनिती विषयक जाणीव, जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोण इ. बाबी " धग " मध्ये अपरिहार्यपणे येतात. त्यामुळेच " धग " प्रादेशिक कादंबरीची पथ्ये पाळून वास्तवतापूर्ण पध्दतीने प्रादेशिक ठरते.

## ग्रामीणता आणि प्रादेशिकता : समीक्षकांची मतमतांतरे

मराठी विश्वकोशात मराठीतील प्रादेशिक साहित्य हे प्रामुख्याने कोकणा विषयीचे आहे असे म्हटलेले आहे. " धग " या कादंबरीचा निर्देशही तेथे प्रादेशिक म्हणून केला आहे. परिसराच्या दूरपणामुळे जे जीवन अस्पृष्ट राहिले होते. त्यास शब्दबध्द करणा-या साहित्यास आम्ही प्रादेशिक असे संबोधतो. आपल्या जवळचे पण खेडयातले म्हणून दुर्लक्षित झाले होते. त्या समाजजीवनाचे चित्रण ज्या साहित्योनेकेले त्यास आपण ग्रामीण साहित्य हा शब्द वापरतो.

ग्रामीण साहित्याचे पुरस्कर्ते आनंद यादव लिहितात " ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाड्.मयाला आपोआप व्यवघात करणारा आहे. म्हणून " प्रादेशिक वाड्.मय " असाच शब्द प्रयोग करणे जास्त योग्य वाटते"[8]

पुढे ते लिहितात, " प्रादेशिक हा शब्द वापरतांना त्या त्या प्रदेशातील " ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण कादंबरीच मानावी लागते" [२] आनंद यादव यांनी पहिल्यांदा समूहजीवन चित्रण आणि व्यक्तिजीवन-चित्रण यांच्या आधारे प्रादेशिक आणि ग्रामीण असे भेद कल्पिले गेले असून शेवटी विशिष्ट प्रदेशातील ग्रामजीवनाचे चित्रण प्रादेशिकमध्ये असतेच असे सांगून त्यांनी या दोन्ही संज्ञा स्वतंत्र मानू नये असे म्हटले आहे.

याउलट नागनाथ कोत्तापल्ले यांनी मात्र या दोन्ही संज्ञा स्वतंत्र आहेत असे म्हटले आहे. संज्ञामधील साम्य मान्य करुन ते म्हणतात, " प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही तर ते महत्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एकभाग म्हणून. येथे ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही, तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्टय असते" [३]

वरील परस्पर विरोधी मतानुसार ग्रामीण-प्रादेशिक साहित्याबाबत एक वाक्यता दिसत नाही. त्यामुळे हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. तरीही ग. ना. जोगळेकर यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, " महाराष्ट्रा,- सारखा मोठा भूप्रदेश अनेक उपभूप्रदेशामध्ये विभागला गेला आहे. त्यामुळेच कोकण, द. महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, खानदेश, माणदेश, बागलाण, विदर्भ, मराठवाडा, आणि महाराष्ट्राचा पूर्वभाग , किंवा गोंडवन असे भौगोलिक दृष्टया पुष्कळ विभाग पडतात. त्या प्रत्येक प्रदेशातील समाजजीवन सांस्कृतिक जीवन आचार-विचार आणि परंपरा वेगळ्या आहेत" [४]

ग्रामीणता आणि प्रादेशिकता हे संज्ञाभेद अगदी कोटेतील अर्थाने घेऊन कादंबरीचे वर्गीकरण कोणत्या तरी एका संज्ञा गटात करणे हे त्या कादंबरीकार अन्यायकारक ठरेल. " धग " ही कादंबरी समूहजीवन चित्रण, व्यक्तिजीवनचित्रणाच्या बरोबरच ग्रामजीवन चित्रण आणि प्रादेशिकचित्रण या दोन्हीतही यशस्वी झालेली आहे. " धग " मध्ये अवतीभवतीचा परिसर, त्या पि परिसरातील विशिष्ट प्रदेशाचे प्रदेशचित्रण यशस्वीपणे झालेले दिसते.

" धग " मध्ये एका विशिष्ट प्रदेशाच्या टप्प्यालातले ग्रामजीवन, ग्रामसंस्कृती येते. हिंगणघाट, तळेगांव, मोझरी

येथील ग्रामसंस्कृतीपेक्षाही प्रदेशाला महत्व येते, व-हाडी भाषेचा संवादातून अर्थवाही वापर केल्यामुळे प्रादेशिकता ठळकपणे जाणवते. प्रल्हाद वडेर यांनी म्हटले आहे, " एखाद्या विशिष्ट प्रदेशातील जीवनाचे चित्रण करणारे वाड्.मय म्हणजे प्रादेशिक असे न मानता एखाद्या विशिष्ट प्रदेशातील निसर्ग आणि मानव यांचे सामूहिक चित्रण करणारे वाड्.मय म्हणजे प्रादेशिक वाड्.मय"[5] " धग " मधील पात्रे आणि प्रदेश यात वेगळेपणा न राहता एकरुप झालेली आढळतात. म्हणूनच " धग " ही कादंबरी " प्रादेशिक" आहे. " धग " प्रादेशिक कादंबरीची पथ्ये पाळून वास्तवता पूर्ण पध्दतीने प्रादेशिक कादंबरी ठरते.

प्रादेशिक कादंबरीतील प्रादेशिकता दुर्लक्षिली जाऊ नये म्हणून आनंद यादव प्रादेशिक कादंबरीसाठी द्विस्तरीय निकष-व्यवस्था सांगतात. आनंद यादव लिहितात, " प्रादेशिक कादंबरीची बाकीचे वैशिष्टये इतर कादंबरीसारखीच म्हणजे कादंबरी एक साहित्यप्रकार म्हणून जी असावी लागतात तितीच असतात...असे असल्यामुळे प्रादेशिक कादंबरीसाठी द्विस्तरीय निकषव्यवस्था अवलंबावी लागते. १. पथ्यव्यवस्था आणि २.मूल्यव्यवस्था, " पथ्य " हा शब्द अनुभवद्रव्याचा निरोगी-पणा, विशुध्दाता दर्शविणारा असतो. " मूल्य" हा

शब्द " कादंबरी " या साहित्यकला प्रकाराचे एकूण कलात्मक मूल्यमापन दर्शविणारा, तिचा दर्जा ठरविणारा म्हणून अभिप्रेत असतो...या दोन निकषव्यवस्थांचा पूर्वोत्तर संबंध मानावा लागतो. पथ्ये पाळली तर ती प्रादेशिक ठरेल, आणि मूल्ये पाळली तर ती कादंबरी ठरेल. म्हणून तिच्या पथ्यांची तपासणी प्रथम आणि तिची मूल्यदृष्टया तपासणी नंतर वोणे यथार्थ समीक्षाव्यवहाराला सोयीचे होणार असते. एखाद्या प्रादेशिक कादंबरीत योग्य पथ्ये पाळली नाहीत तर तिच्यातील प्रादेशिक जीवन एक तर अवास्तव असेल किंवा हीण मिसळलेले असेल. अनुभवद्रव्यच जर प्रादेशिक कादंबरीत अशा रीतीने अवास्तव, आरोपित किंवा हीण मिसळलेले असेल. तर तिला प्राप्त झालेले रुप ( अभिव्यक्त आकार ) " प्रादेशिक कादंबरी" या नात्याने तिचा अनुभव घेणा-या रसिकाला प्रत्ययकारी वाटणार नाही. म्हणूनच तीने पाळायच्या पथ्यांची तपासणी प्रथम करुनच नंतर कादंबरी ती कोणत्या दर्जाची आहे हे पाहणे योग्य ठरते."[६]

प्रादेशिकतेची खास कांही वैशिष्टये आढळतात, प्रादेशिकता म्हणजे प्रामुख्याने कांही भौगोलिक वैशिष्टयांनी निर्देशित करता येणारी ग्रामपरिसर संबध्दता, लोकजीवनाचा वेगळेपणा, लोक-जीवनाची सामूहिकता, तेथील निसर्ग आणि मानव यांचे परस्पर जीवन आणि मुख्य म्हणजे शहरापासूनचा दुरचा, दुर्लक्षित

भाग परिसर होय. प्रदेशाच्या सामूहिक जीवनाचा रंगगंध चित्रित करणाऱ्या कादंबऱ्याच्या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर " परिवेशप्रधान " हा शब्द वापरतात." [७] प्रादेशिकता म्हणजे अशी परिवेश प्रधानता होय. सार्वकालिक जीवनसत्य अभिव्यक्त करणारी व्यशस्वी प्रादेशिक कादंबरी प्रादेशिकतेचे पथ्य पाळते.

द. भि. कुलकर्णींच्या मते, " प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचाच अधिक वास्तवपूर्ण अविष्कार आहे " [८] ना.सी. फडके यांनीही " प्रादेशिक कादंबरी" अशी कादंबरीची स्वतंत्र तऱ्हा मानण्याचे वास्तविक कारण नाही. ग्रामीण साहित्याचीच ती एक शाखा आहे," [९] असे म्हटले आहे. ना. सी. फडके यांना ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्यामागील प्रेरणा एकच आहे, असे वाटते. त्यामुळे ते त्या दोहोत भेद मानायला तयार नाहीत.

प्रादेशिकतेला महत्व देऊन ग्रामीण आणि प्रादेशिक यातील भेद स्पष्ट करतांना म. सु. पाटील म्हणतात, " ज्याला आपण ग्रामीण म्हणतो ते जीवन प्रादेशिकते इतके निसर्ग नियत नसते. ग्रामीण जीवन हे ग्रामीण व्यवसाय आणि ग्राम-संस्था यांच्या चौकटींनी अधिक नियत असते...प्रादेशिक कादंबरीतील पात्रांच्या वृत्ति-प्रवृत्तीवर प्रदेशाचे संस्कार जितके

प्रबळ असतात तितके ग्रामीण कादंबरीतील पात्रावर नसतात"[१०] ग्रामीण जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणारे साहित्य म्हणजे " ग्रामीण " साहित्य असे आपणास म्हणता येईल. ग्रामीण भागात सर्व दूर पसरलेल्या एक विशिष्ट संस्कती असते. गावाची रचना, गावातले रितिरिवाज हे परंपरेने चालत आलेले असतात. प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्या-पेक्षा व्यापक आणि विस्तृत आहे. प्रादेशिक साहित्यामध्ये ग्रामीण साहित्यही अपेक्षित असते.

" प्रादेशिक " ही ग्रामीणाला पोटात घेणारे मोठे वर्तुळ आहे[११] ही गोष्ट मान्य करुन र. बा. मंचरकर लिहितात, " समूह दर्शन, परिसर प्राधान्य आणि विस्तृत कॅनव्हास यामुळे ग्रामीण साहित्याला प्रादेशिक रुप येऊ लागते. १९६० पूर्वीची ग्रामीण कादंबरी बाहय वास्तवाची जाणीवपूर्वक दखल घेणारी दिसते. परिसराशी त्या त्या भौगोलिक वास्तवाशी ती अधिक निबध्द आहे. या स्थानतिष्ठतेमुळे, पूर्वीच्या ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचे परिणाम लाभतांना दिसते"[१२]

एकंदर ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक असा भेद मानावा की मानू नये या विषयी समीक्षकांमध्ये एकमत नाही. प्रादेशिक कादंबरीतील प्रादेशिकता दुर्लक्षिली जाऊ नये म्हणून आनंद यादवांनी प्रादेशिक कादंबरीसाठी द्विस्तरीय निकषव्यवस्था सांगतात. आपण जेंव्हा एखाद्या साहित्यकृतीला प्रादेशिक साहित्य कृती म्हणतो त्यावेळी प्रादेशिक वैशिष्टयांनी युक्त

असे जीवनचित्रण करणे हिच त्या साहित्यकृतीची निर्मिती प्रेरणा असली पाहिजे असे समजतो.

प्रादेशिकतेचे वेगळेपण

विशिष्ट ग्रामीण परिसराला स्वत:चे विशिष्ट व्यक्तित्व का लाभते हे अभ्यासतांना त्या ग्रामीण जीवनाचे नागरी जीवनापासून असलेले दुरत्व लक्षात घ्यावे लागले. याबाबत चंद्रकांत बांदिवडेकर यांचे विधान अभ्यसनीय आहे. " नागर जीवनापासून दूर व प्राचीन भारतीय व्यवस्थेमुळे पुष्कळसे आत्मा-वलंबी राहिलेले क्षेत्र स्वत:ची वैशिष्टये टिकवून धरते व त्याला एक प्रकारचे स्वत:चे असे व्यक्तिव ( वा चेहरा ) मिळालेले असा असते. ..या क्षेत्रातील लोक सामूहिक जीवन जगतात. त्यांच्या बोलण्या-चालण्याला विशिष्ट लकबी असतात. त्यांच्या स्वभावाला एक वेगळेपणा प्राप्त झालेला असतो. त्यांचे रीतीरिवाज, खाण्यापिण्याच्या सवयी, पेहराव पध्दती, त्यांचे सण, त्यांच्या परंपरा, त्यांची संस्कृती, त्यांचे मौखिक वाड्.मय, जन्म, विवाह मृत्यू या प्रसगी रूढ झालेले विधी, त्यांचे परस्परातील संबंध, त्यांची कुटूंबव्यवस्था, आर्थिक स्थिती, उद्योग व करमणुकीचे प्रकार या गोष्टींनी क्षेत्रविशिष्ट लोकजीवनाला एक वेगळा घाट आलेला असतो. या घाटला भौगोलिक परिस्थिती, निसर्गाचे सान्निध्य विशिष्टता देत असतात."[१३]

सर्वच कादंब-यामध्ये प्रदेश असतो, मग काहींना प्रादेशिक म्हणावयाचे आणि काहींना प्रादेशिक म्हणावयाचे नाही असे का ? कारण कथानक जिथे घडते, त्या विशिष्ट प्रदेशाकडे

द्यावे तितके लक्ष सर्वच कादंबरीकारांनी दिलेले नसते. खरेतर काही कादंब-यातील विशिष्ट प्रदेश कादंबरीचा एक घटक अविभाज्य भाग म्हणून आलेला असतो. म्हणूनच सर्वच कादंब-यामध्ये कुठला ना कुठला प्रदेश असला तरी सर्वांनाच प्रादेशिक कादंबरी म्हणून संबोधता येत नाही.

श्री. ना. पेंडसे यांच्या कादंब-याविषयी लिहतांना स.रा. गाडगीळ यांनी प्रादेशिकतेचे वेगळेपण अचूकपणे टिपले आहे. ते लिहितात, " विशिष्ट प्रदेश आणि त्या प्रदेशाच्या मातीत वाढलेली माणसे यांच्या आंतरिक स्पंदनाचे, संवाद-विसंवादाचे दृश्य आणि अदृश्य साम्य साकार करणारा कलावंत हा सामान्य नव्हे एवढे निश्चित. प्रादेशिकतेला स्वतंत्र कलामूल्य नाही, हे निश्चित पण तरीही प्रतिभावंत कलावंतांनी साकार केलेल्या, प्रादेशिकतेचे आगळेपण कलाकृतीला अनन्यसाधारणत्व प्राप्त करुन देते, हे मान्यच करावे लागते. पेंडशाच्या कादंब-याना जे अनन्यसाधारणत्व लाभलेले आहे. जो वैशिष्टयपूर्ण स्वाद लाभला आहे, त्याचे रहस्य कोकणाच्या अंतरंग दर्शनातच आहे"[१४] कलात्मकता, उत्कटता आणि अस्सलपणा हा प्रादेशिक साहित्यकृतीचा धर्म असतो. प्रादेशिक जीवनाची अस्सल अभिव्यक्ती ती साकार करते. वास्तवचित्रण ही प्रादेशिक साहित्याची प्रकृती असते.

एखाद्या साहित्यकृतीला " प्रादेशिक" म्हणतो त्यावेळी तिच्यात प्रदेश हा महत्वाचा घटक असतो. तो प्रदेश त्या कादंबरीच्या संरचनेतील एक अविभाज्य घटक असला पाहिजे. व्यक्ती आणि प्रदेश यांच्यातील व्यामिश्र असे संबंध लेखकाने उलगडून दाखवता आले

पाहिजेत. व्यक्ती, वातावरण, भाषा या सर्वांचे एक व्यामिश्र एकतां उत्कट कलात्मकपातळीवर साकार झाली पाहिजे. प्रादेशिक कादंबरीतील लोकजीवन वास्तवाच्या पातळीवरचे, कांहीसे प्रातिनिधिक स्वरुपाचे असावे अशी अपेक्षा असते. वास्तव जीवन-चित्रणाची प्रेरणा हे प्रादेशिक कादंबरीचे प्रमुख वेगळेपण आहे.

आपण अशाप्रकारे ग्रामीणता आणि प्रादेशिकता या वादाबाबतची महत्त्वाच्या समीक्षकांची मतमतांतरे अभ्यासली. विशेषत: प्रादेशिक कादंबरीचा वेगळेपणा प्रकट करणारी मते पाहिली.

" धग " ही प्रादेशिक कादंबरी, प्रादेशिक वास्तवाचे प्रखर आकर्षण असलेल्या कलात्मक अलिप्ततेने शेळके यांनी लिहिली, आहे. ग्रामीण जीवनातील वास्तव अनुभव सांगणारी ही प्रादेशिक कादंबरी सामान्यातील असामान्यत्वाचा शोध नि वेध घेते. अशा प्रादेशिक कादंबरीची प्रादेशिकता अभ्यासण्या-पूर्वी प्रादेशिकतेचे कोण-कोणते घटक असतात ते पाहू या.

कांदबरीची प्रादेशिकता

प्रदेश म्हणजे भूभाग आणि एका भू-भागाची, तेथील जीवनाची वैशिष्टये म्हणजे प्रादेशिकता. हे जीवन ज्या साहित्यात चित्रित झालेले असते, त्या साहित्याला " प्रादेशिक साहित्य" असे म्हणतात.

## प्रादेशिकतेचे घटक

१. भौगोलिकता : प्रादेशिकतेत सर्वप्रथम जाणवणारा घटक म्हणजे भौगोलिकता. प्रत्येक प्रदेशाचे त्या वेगळया अस्थित्वामुळे एक वेगळे वैशिष्टय असते. हा प्रदेश, शहरापासून दूर असतो. तो प्रामुख्याने ग्रामीण असतो.

२. निसर्ग : इथे निसर्ग मानवी जीवनाशी कमालीचा एकरुन झालेला असतो. निसर्गाला महत्वाचे स्थान असते. " प्रादेशिक कादंबरी" असा कादंबरीचा स्वतंत्र प्रकार मानावयाचा असेल तर तिच्यातले निसर्गचित्रण प्रभावी असायला हवं"[१५] असं ना. सी. फडके यांना नमूद केले आहे. मानवी जीवनापासून इथला निसर्ग वेगळा करता येत नाही.

३. संस्कृती, रचना, परंपरा : एका विशिष्ट परिसरामध्ये विशिष्ट संस्कृती असते. त्या परिसरातील पंरपरेप्रमाणे तेथील लोकजीवन जगत असतात. प्रादेशिकतेमध्ये तेथील विशेष संस्कृती, गांवाची, घरांची रचना आणि तेथील पंरपरा व लोकजीवन यांचा समावेश होतो.

४. सामूहिकता : प्रादेशिक जीवन हे प्रकारचे समूहजीवनच असते, त्यांच्या वागण्या-बोलण्यातून, चालण्या-फिरण्यातून, त्यांच्या स्वभावाला एक वेगळेपणा निर्माण झालेला असतो. त्यातून सामूहिकता निर्माण होते. खेडेगांवातील समाजजीवन हे एकजिनसी स्वरुपाचे असते. इथेच राहायचे आहे, इथेच जगायचे आहे. या भावनेतून एक आपुलकीचे भावनिक वातावरण

निर्माण झालेले असते. विशिष्ट पारंपारिक चौकटीच्या आतच लोकजीवनाचे व्यवहार इथे चालतात.

प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट भागातील जनजीवन तिथल्या लोकसंस्कृतीसह साकार होत असल्याने एका वेगळ्या जीवनाचे दर्शन या वाङ्.मयातून घडणार असते.

५. भाषा : प्रादेशिक कादंबरीत बोलीभाषेचा वापर केला जातो. स्थानिक भाषेला प्रादेशिक कादंबरीत मोठे महत्व असते. प्रादेशिकतेचे वेगळेपण जाणवते ते भाषेमुळेच. लोककथा, वाक्यप्रचार, म्हणी, अनोळखी शब्द, शब्दांचे वेगळे अर्थ, प्रसंगी शिव्या सुध्दा अतिशय रांगडया स्वरुपात येतात. प्रादेशिक बोली ही त्या त्या प्रदेशातील लोकजीवनाचा एक अविभाज्य भाग असतो. प्रादेशिक कादंबरीला त्या त्या प्रदेशाच्या बोलीमुळे अविष्कारात्मक वैशिष्टय मिळालेले असते. प्रादेशिक बोली हा त्या प्रदेशातील लोकजीवनाचाच एक भाग असतो. तिच्यातून तेथील लोकजीवन, लोकमानस प्रकार होत असतो. भाषा ही जीवनानुगामी असते. बोली भाषेतील शब्द संहती, वाक्यप्रचार, म्हणी यांच्यामुळे विशिष्ट प्रादेशिक लोक जीवनाचे व त्यातील समाजमनाचे दर्शन घडते.

येथे आपण विशिष्ठ भौगोलिकता, निसर्ग, सामूहिकता, लोकसंस्कृती, चालीरोती, भाषा इ. प्रादेशिकतेचे वैशिष्टये ठरतात हे पाहिले. आता आपण " धग " कादंबरीची प्रादेशिकता" अभ्यासू.

" धग " या कादंबरीची प्रादेशिकता

" धग " ही कादंबरी कुटुंबाच्या वाताहतीचे चित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी होय. कौतिक ही हिंगणाघाटची. तिचे लग्न रघुनाथ शिंप्याचा मुलगा महादेव याच्याशी झालेले आहे. रघुनाथ शिंपी हा तळेगांवचा. लग्नानंतर कौतिक आपला नवरा महादेव नि मुले यांचेसह आपल्या माहेरी येऊन राहिलेले असते. कौतिक आपल्या भावाच्या घरात रहात होती. तिचा भाऊ गोविंदाचे आणि कौतिकचे कुटुंब एकत्र होते. या दोन कुटुंबाच्या चौकटीतून कौतिक मुलाबाळासहित नव-यासह बाहेर पडताच तिची होणारी दु:खद फरफट, जीवन जगण्याविषयीची तिची आसक्ती नि तिला पराभूत करणारी नियती यांचे एक वेधक नि भेदक दर्शन " धग " मध्ये उद्धव ज. शेळके यांनी घडविले आहे.

उदासीन वृत्तीचा महादेव आणि जीवापाड मेहनत करणारी कौतिक या दोन परस्पर विरोधी टोकाच्या स्वभावाच्या व्यक्तींच्या सहजीवनाचे चित्रण लेखकाने मोठ्या कौशल्याने केले आहे. एका सामान्य शिंपी कुटुंबाची ही कहाणी अशी शोकांतिका बनते. पण माणसाचे जीवनावर किती विलक्षण प्रेम असते, हे प्रेमच अनंत समस्यांना आणि संघर्षाला सामोरे जाण्याचे प्रचंड बळ माणसाला कसे देते, याचा खराखुरा जीवंत अनुभव कौतिकच्या व्यक्तिचित्रणातून येतो.

मराठी विश्वकोशात " धग " चा निर्देश प्रादेशिक कादंबरी म्हणून केलेला आहे. ब-हाडच्या पार्श्वभूमीवरील ही उत्कृष्ट प्रादेशिक कादंबरी आहे. " धग " वैशिष्टय-पूर्ण प्रादेशिकत्वाचा ठसा उमटवते. विदर्भातली प्रादेशिकता आणि " धग " मधील व्यक्तिरेखा यात वेगळेपणा न राहाता ते एकरुप होऊन जातात. प्रादेशिक कादंबरीत प्रदेश हाही व्यक्तिचित्रणापैकीच " एक व्यक्ती " किंवा " एक पात्र " म्हणूनच कादंबरीत उपस्थिती दर्शवितो. " धग " या कादंबरीची प्रादेशिकता अभ्यासण्यासाठी प्रादेशिकतेचे घटक - भौगोलिकता, निसर्ग, रचना, परंपरा इ. घटक म्हणजे काय ते पाहिले. आता या प्रादेशिक घटकांच्या, वैशिष्टयांच्या आधारे " धग " मधील प्रादेशिकता अभ्यासू.

" धग " मधील भौगोलिकता

प्रस्तुत कादंबरीचे कथानक सुरु होते ते व-हाड प्रांतातील छोटेखानी तालुकेवजा गांवच्या पार्श्वभूमीवर. हिंगणघाट, तळेगाव, मोझरी, तिवसा, कौंडण्यपूर, अमरावती, वर्धा इ. गांवाच्या परिसरात " धग " चे कथानक घडते. व-हाड मुलखात घडणा-या या कादंबरीत आवश्यक तेवढाच मर्यादित भू-भाग आलेला आहे. ही कथा घडते ती हिंगणघाट, तळेगांव मोझरी या विदर्भातल्या खेडयात. हा सर्व परिसर त्यातल्या व्यक्तित्वांशी, म्हणजेच त्या व्यक्तित्वांच्या जीवनाशी एकरुप झाला आहे. विदर्भातल्या या प्रदेशाची प्रादेशिक-अस्मिता जपेपासली आहे. कादंबरीच्या कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण आणि भाषा यांच्यावर विदर्भातल्या विशिष्ट

भौगोलिकतेचा परिणाम, प्रभाव दिसून येतो.

विदर्भातल्या भौगोलिक परिस्थितीमुळे कापूस, तूर जोंधळा, तीळ, मूग, भूईमूग ही पिके तेथे घेतली जातात. विदर्भात मध्यम व निश्चित स्वरूपाचा पाऊस पडतो, " धग " मध्ये कौतिक व महादेव शेतमजुरी करतात. ऋतुमानानुसार या कामात बदलही होतात. कधी कापूस वेचण्याचे काम, तुरी बडवण्याचे काम अशा त-हेची कामे त्यांना मिळतात. झोंबणा-या उन्हात कौतिकचे कूटूंब कमरेला खंदाडया गुंडाळून कापूस जमा करण्याचे काम, रोजदारीने करतात.

विदर्भात शुष्क पानझडी अरण्ये आढळतात, प्रस्तुत कादंबरीत महादेव कुंपणासाठी बाभळीचे, बोरीचे फास बैलगाडीतून आणतो. कौतिक जळणासाठी प-हाटया, रान-गोव-या गोळा करते. विदर्भातल्या उग्र उन्हाळयाचे वर्णन येते. काशीशार जमीन पेटल्यासारखी वाफ ओकत होती. अशा कडक उन्हाळयात लोक झोपा काढतात, पण कौतिकची धडपड चालूच होती. या प्रादेशिक भौगोलिकताचा प्रभाव तेथील जीवनावर पडलेला आहे. मात्र अशाही विपरित परिस्थितीत कौतिकची धडपड सुरुच होती. तेथील भौगोलिक वर्णनामूळे कौतिकचे व्यक्तित्व उठून दिसते.

हा प्रदेश शहरापासून दूर व आडवळणी आहे. तो ग्रामीण आहे. कौतिकच्या यशोदीचा जन्म झाला तेंव्हा कडक उन्हाळा होता. त्यामुळे पहिले पाच दिवस कौतिक तिला केळीच्या पानात लपेटून ठेवते. येथे या प्रसंगात लेखकांनी केळीच्या

पानात कडक उन्हाळयात लहान मुलास गारवा मिळवा म्हणून कसा उपयोग करुन घेतात, हे वास्तवपणे दाखवून दिले आहे.

कौतिक-महादेव यांच्या दैनंदिन कामाचा नित्यक्रम हा प्रदेशाधिष्टित आहे. कौतिक नामाला भीमाचा शोध घेण्याचा सांगते. तिवशावरुन परत आलेला नामा सांगतो " होटलातलं एक पोरग मने, का संत-याच्या ठेल्यावर बसून उमरावतीले गेला कानं...." या विधानातून विदर्भात पिकणारी संत्री ही प्रदेशाशी संबंधीत आहे, ती तीथे अपरिहार्यपणे येते.

वर्धेच पात्र मोझरीची गावंनदी प्रादेशिकतेचे निशान घेऊन येते. " धग " मध्ये येणा-या परिस्थितीशी ही सारी माणसे झुंज घेतात. जीवाच्या आकांताने झगडा मांडतात. कौतिक ही अशी जिद्दी स्त्री आहे.

या कादंबरीत आवश्यक तेवढाच भू-भाग आला आहे. हिंगणघाट, मोझरी, तळेगांव हा सर्व परिसर त्यातल्या व्यक्तित्वाशी एकरुप झाला आहे. तेथील विशिष्ट भौगोलिकता " धग " मध्ये अनुभवसंपन्न करण्यात शेळके यांना यश लाभले आहे.

" धग " मधील निसर्ग

कादंबरीतल्या जीवननाटयात निसर्ग जिवंतपणे साकार झालेला आहे. " धग " मधील व्यक्ती आणि निसर्ग यांच्यात भेद दाखविणे शक्य नाही, कारण त्यांचे जीवन निसर्गावर अवलंबून आहे. व्यक्तींच्या अवतोभोवतीचे आवश्यक असेल तेवढेच निसर्ग वर्णन येथे चित्रित होतात.

" हंगाम ज्वानीत होता, तूर सोंगायला आली होती जोंधळा खुडायला झाला होता...तशात आकाशात ढगांची टेहळणी सुरु झाली होती. माजलेला वारा उभ्या पिकाशी जीवघेणी मस्करी करीत होता. वावरधन्यांना भिववत होता." (पृ-४० धग)

वरील लेखकाने विदर्भातल्या केलेल्या निसर्ग वर्णनातून विदर्भातल्या मातीमधल्या पिकांच्या श्रीमंतीचे वर्णन केले आहे. विदर्भातल्या कडक उन्हाळयाचेही ते वर्णन करतात" " व-हाडच्या उग्र उन्हाळयाचा वणवा वातावरणाला मिठी मारुन बसला होता. पेटल्यासारखी काळीशार जमीन वाफ ओकीत होती. हाकेच्या अंतरावरच माणूस किंवा जनावर पाहतो म्हटलं तर नीट दिसत नव्हतं. वाफेच्या विरमळतगरापलीकडची त्याची आकृती वाहत्या पाण्यातल्या प्रतिबिंबासारखी थर थरताना दिसत होती" (धग-पृ-५३)

अथवा पावसाच्या आगमनाच्या अगोदरचा निसर्गचित्रण शेळके " धग " मध्ये पुढीलप्रमाणे करतात." थोडयाच दिवसात वातावरणावर पावसाळी ओलावा चढला. आकाशात ठाणं ठेकून बसलेल्या ढगुल्यांनी कास्तकारांच्या सुस्तीला भिववून सोडलं. आपआपली पेरणी आटोपण्यासाठी ते धडपडू लागले."

विदर्भातल्या ग्रामजीवनातील निसर्ग कथानकास अजोड म्हणून एकरुप होऊन येतो. " धग " मध्ये निसर्गवर्णन अल्प प्रमाणातच येते. परंतु जे येथे ते स्वाभाविकपणेच. येथील निसर्ग चित्रण अकृत्रिम विदर्भाच्या जीवनाशी एकरुप होऊनच साकार झाले आहे. मानवी जीवनापासून इथला निसर्ग वेगळा करता येत नाही.

" धग " मधील लोकसंस्कृती आणि चालीरिती

कौतिकचे कुटुंब , गोविंदाचे कुटुंब, रघुनाथ शिंपी हे सर्वजण परंपरागत कपडे शिवण्याचा धंदा करतात. ग्रामीण जीवनातील सण-उत्सव-आठवडे बाजार जत्रा असतात तसेच इथेही तेच वातावरण आहे.

" धग " मध्ये शौंदूर्जन्याचा बाजार चित्रित झालेला आहे. सालबर्डीची जत्रा, महादेवाची जत्रा यांचा संदर्भ येतो. इथली. मनोरंजनाची साधने सर्कस, तमाशा, गारुडयाचा खेळ हे आहेत. मारुतीच्या पारावर भजन म्हणणारा महादेव-कासम आणि गावकरी आहेत.

कौतिक दिवाळीचा सण करते. दिवाळी दिवशी रिवाजाप्रमाणे पाटलाच्या वाडयावर सनई वाजवली जाते. गरीब परिस्थिती असूनही कौतिक लक्ष्मी-पूजन करते. कौतिकेचे कुटुंब पोळा सण साजरा करतात. मोझरी गांवातील उत्साहात होणाऱ्या पोळा-सणाचे चित्रण लेखकांनी केलेले आहे. बैल-वासरांना झुला पांघरुन, नव्या कोऱ्या घंटा, घुंगरवं गळयात अडकवून गावठाणावर पोळा भरतो. सर्व गावकरीनवीन कपडे घालून पोळा पाहाण्यासाठी जमा होता. सारा गांव बैलांची पूजा करतो. त्या दिवशी पहाटे उठून सारा गांव " वैरी

दुस्मानाले घेऊन जा य ओ मारबत " असे म्हणतो. तयाच दिवशी तान्हा-पोळा लहान मुले लाकडा-मातीचे बैल घेऊन साजरा करतात. त्यादिवशी गावठाणावर सर्वजण जुगार खेळतात. कौतिकचा भीमा जुगार खेळायला जातो. त्याचे कौतिकला वाईट वाटत नाही. कारण त्या दिवशी जुगार खेळणे हा तेथील जीवनातील रिवाज आहे.

कौतिकच्या कुटूंबाचे दैवत शादलबुवा आहे. कौतिक मोहरम हा सण करते. नामाला फकिर होऊन चार घरे भिक्षा मागायला सांगते. आलेल्या भिक्षावळीतून ती शादलबुवाला नैवेद्य दाखवते. महादेवा नवा धंदा सुरु करतांना ती बोहानी करते.

कौतिकचा सासरा मृत्यू पावतो. कौतिक तळेगांवला जाते. मृत्यू पावलेल्या रघुनाथ शिंप्याला अग्नी दिला जातो. महादेव आला नाही म्हणून नामाच प्रेताला अग्नी देतो. कौतिकच रघुनाथ शिंप्याचेदिवसपाणी करते. विदर्भातल्या ग्रामीण भागातील लोकांची लोकसंस्कृती चालीरिती " धग " मध्ये बारीक व तपशीलासह प्रकट होतात.

कासम तिच्या मुलीला, बानोला, नवरा पाहाण्यासाठी बाहेर गांवी जातो. त्याचे घर पाहतो. बानोची सगाई होते. कौतिक यशोदीला दृष्ट झाली म्हणून गोव-यांचा विस्तव तव्यात घेऊन पळाभोवती कच्च्या दो-याचे फेर गुंडाळून तो विस्तवावर ठेवते. अशा प्रकारे अंधश्रध्दांचे हे चित्रण विदर्भातल्या ग्रामीण लोकसंस्कृतीचा भाग म्हणून येते.

विदर्भ या प्रदेशातील बोली भाषा आहे व-हाडी, ही हिंगणघाट, तळेगांव, मोझरी इथे " धग " चे कथानक घडते. या ग्रामीण भागातील अंधश्रध्दा, त्यांचे सण, समारंभ मनोरंजनाची साधने, रीती-रिवाज, देवता,आणि त्याची विशिष्ट भाषा यातून एक विशिष्ट संस्कृती आकाराला आली आहे. " धग " मधील लोकसंस्कृतीचे, चालीरितीचे चित्रण प्रादेशिकतेचा ठसा उमटविते.

" धग " मधील सामूहिकता

प्रादेशिक जीवन हे एक प्रकारचे समूहजीवनच असते. कौतिकची कथा हिंगणघाट, तळेगांव, मोझरी या विदर्भातल्या खेडेगांवात घडते. कौतिक-महादेव, कासम-सकीना, सीता-सुखदेव ही सारी पात्रे आणि विदर्भ प्रदेश यात भिन्नत्व न राहता त्यात सख्यत्व नि समीपत्वच आढळून येते.

ग्रामीण भागातल्या शिंपी कुटुंबाची जीवनकहानी " धग " मध्ये चित्रित होते. हिंगणघाटला दोन कुटुंब एकत्र राहात होती. खेडेगांवातील समाजीवन हे एकजिनशी स्वरुपाचे असते. भांडण करुन वेगळे झालेल्या महादेवच्या कुटुंबाला त्याची सासू गोदूबाई मदत करते. कौतिकची भावजय गंगा नामाभ्भीमाला तळणाचं घालते. तळेगावला फारशी ओळखदेख नसताना

कौतिकच्या कुटुंबाची चहा-जेवणाची सोय करणारे लोक श्रीमंत नसतात. त्यांच्या या सहजगत्या साध्या प्रसंगातून प्रादेशिक दिलदारपणा प्रकट होतो.

महादेव-कौतिक तळेगांवात येतांना गांवात प्रवेश करते. वेळी केंव्हा आले कसे आले हे असे गांवकरी विचारपुस करतात. घरात पोहचल्यानंतर बायका-माणसं जमा होतात. जन्मोजन्मीची ओळख असल्यासारखी बोलतात. सवेिता म्हालीण, सुईनं म्हणून काम करणारी मांगीण हि सर्व मिळून एकजिनसी स्वरुपाचे वातावरण ग्रामीण भागात निर्माण झालेले असते. सकीना-कासम हे मुस्लीम असूनही शेजार धर्माला जागून कौतिकच्या कुटुंबाला राहाण्यास जागा देतात. संकटकाळात धीर देतात, मदत करतात.

कौतिकशी रघुनाथाचे भांडण होते तेंव्हा सीता म्हालीण मदतीला धावून येते. रघुनाथ शिंपी आजारी आहे हे निरोप देण्याचे काम सुखदेव करतो. शेजार हा ही जीवनाचा एक आधार असतो. जातीच्या पलिकडे असणारी माणुसकी कासम-सकीना यांच्या वागण्यातून प्रकट होते. वेडी झालेल्या कौतिकच्या मुलांची काळजी हे मुस्लीम जोडपेच घेते. वेटर झालेल्या नामाला ते मानसिक आधार देतात.

इथेच राहायचे आहे, इथेच जगायचे आहे, या भावनेतून हिंगणघाट, तळेगांव, मोझरी येथे एक आपुलकीचे भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. विशिष्ट पारंपारिक चौकटीत शेतकरी शेती करत आहेत. शिंपी समाजाचा कपडे शिवण्याचा

धंदा आहे, कासमचा लोहार धंदा आहे. त्यामुळे त्यांच्या वागण्या-बोलण्यात, चालण्या फिरण्यातून व-हाडी माणसांचा वेगळेपणा निर्माण झालेला आढळतो.

" धग -"मधील जीवनाचे दर्शन

प्रस्तुत कादंबरीत व-हाड प्रदेशातील ग्रामीण जीवनाचे दर्शन होते. व-हाडातील लोकसंस्कृतीसह एक नविन जीवन पहावयास मिळते. तेथील निसर्गाशी त्यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो. तेथील माणसांचे विशिष्ट स्वभाव व्यक्तिचित्रणाला उठाव आणतात. कौतिकचा स्वभाव जिद्दीआहे. महादेवचा स्वभाव मवाळ आहे.

शिंपी समाजाच्या जीवनाचे दर्शन " धग " मध्ये येते. शिलाई मशिनवर कपडे शिवून गुजराण करणा-या लोकांचे दारिद्री जीवन उत्कटपणे शेळके साकार करतात. एका शिलाई मशिन न मिळाल्यामुळे महादेव-कौतिक मुलाबाळांसह एका गांवाहून दुस-या गांवाकडे स्थलांतर करतात. जीवनाच्या प्राथमिक प्रश्नासाठी ते धडपडत राहातात.

" धग " ही पतीवर श्रध्दा असलेल्या, त्याचा कमकुवतपणा जाणून घेऊनही त्याच्यावर प्रेम करणा-या, मुलाबाळाच्या रुपाने पुढची पिढी अधिक चांगली व्हावी, यासाठी धडपडणा-या एका स्त्रीची कहाणी आहे. " धग " मधील मध्यवर्ती संघर्षातून विदर्भातील तळागाळातील शेवटच्या माणसांचे जीवन चित्रित झाले आहे.

झाले आहे.

अस्सल ब-हाडी जनजीवनाचा व प्रादेशिकतेच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक संबंधही कादंबरी चित्रण करते. नव्या पिढीची बदलती जीवनमूल्ये कशी असतात. हे भोमाच्या व्यक्तिचित्रणातून लेखक समर्थपणे मांडतो. भीमा पंरपरागत पद्धतीने आलेला शिंपी व्यवसाय न करता मालिश, चंपी कधी तमाशा तर कधी सर्कशीत काम करतो.

कौतिक-महादेव, कासम-सकिना यांच्या व्यक्तित्वातून सहनशीलवृत्ती दिसते. कौतिक साधी, सरळ, सोशिक आहे. भांडवलशाही समाजव्यवस्थेने ग्रामीण जीवनात केवढी तरी मोठी आर्थिक विषमता निर्माण झाल्यामुळे पोटावर जगणा-या कुटूंबाचे काय हाल होतात, याचे चित्रण करुन शेळके ग्रामीण समाजातील नव्या जीवनाचे दर्शन घडवितात.

या कादंबरीतील अनुभवविश्व व्यापक परिणाम घेऊन साकार होते. निव्वळ वर्णनात्मक स्वरूपाचे प्रादेशिक वातावरण या कादंबरीत येत नाही. या प्रादेशिक जीवनाचे आगळे दर्शन " धग " मध्ये शेळके चित्रित करण्यात यशस्वी झालेले आहेत. प्रस्तुत कादंबरीत जीवनाचे दर्शन वर्णनांपेक्षाही संवाद रूपानेच अधिकत: स्पष्ट केल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनातील माणुस-कीचे ओलावे कासम-सकीना, सुखदेव यांच्या व्यक्तिचित्रणातून कौशल्याने प्रेकट होतात. प्रत्येक व्यक्ती ही त्याच्या त्याच्या स्वभावानुसार वागते.

" धग " मधील भाषा

" धग " मध्ये निवेदन प्रमाणभाषेतून केलेले आहे, उद्धव ज. शेळके यांनी ही कादंबरी निवेदनात्मक स्वरुपात सांगितली आहे. संवादामध्ये व-हाडी बोली भाषेचा अर्थवाही उपयोग केलेला आहे. निवेदनात्मक स्वरुपापेक्षा ती संवादरुपाने अधिक बोलकी केली आहे. निवेदनात कोठेही नाटकीपणा किंवा ओढून ताणूनकेल्यासारखे वाटत नाही. संवादातही बोलीभाषेच्या वापराचे फाजील स्तोम नाही. त्याचे कुठेही स्वरुप दिखाऊ आणि वरवरचे वाटत नाही. साध्या सरळ निवेदनातून आणि व्यक्तीनुरुप, प्रसंगानुरुप स्थळ कालानु रुप हे संवाद विदर्भाच्या बोलीभाषेत लिहिले गेल्याने ते अधिक प्रभावी झालेले आहेत. संवाद नि निवेदनाची भाषा ही दोन्ही परस्परपूरक ठरलेली आहेत.

ग्रामीण साहित्याचे सौदर्य स्वाभाविक ग्रामीण भाषेच्या उपयोजनाने अधिक वाढते. " धग " मध्ये याचा उत्तम अनुभव येतो.

भीमा-बानो प्रसंगामुळे घडलेला एक संवाद उदाहरण दाखल पाहाण्यासारखा आहे.

कौतिक सकीनाला विचारते, " सांगतं का नाई कयच झालत आता तू "

" काडय संगाले लावतं आमचकरमा "

" काईई असो, जे काय असनं थें सांगबा । मी तुई बहीन नोय काय ? " सकीनानं उसासा टाकला. डोळे कोरडे केले. पण बोलली नाहीच.

" सांगत नाई का, तू " कौतिक म्हणाली, " तू मले खासीन त नाई सांगशीन ।

सकीना बोललीच नाही, हातातल्या पिठाचा उंडा जेरर लावून मळत राहिली.

कौतिक म्हणाली, " तुले यशोदेची आन आये "

" हित् बोहा-यावफनाचे थ्या बिमार लेकाइसी, असं भलतसलतं नोको बोलू..."

" त मगं, काय झालं थे सांग - सरकं सुदं" सकीना अगतिकपण्णानं म्हणाली, " काय सांगाले लावतं माय...भीमा बानोच्या वाटी गेला..."

ऐकताच कौतिकचं शरीर पालेला पाहून विंचवाचं पडावं तस सैलं पडलं.

कौतिकच्या बोलण्यात विदर्भातील काही म्हणी व वाक्यप्रचारही येऊन जातात. नामाला आपल्या शाळेचे पुढे काय ? असा प्रश्न पडतो, नामा कौतिकला विचारतो,

" मा, आता माझ्या शायेचं कसं ओ "

" कसं कायचं । " ती सहजगत्या म्हणाली होती,

" चालत जा माहयासंग वावरात, लेका, तुझ्या
तकदीरालेत चारासून भोकं आये, त्याले तू तरी काय
करसीन आन् मी तरी काय करु।""

" सारा सापा आणि देवबाप्पा।" किंवा " माणं तशी माती, गहू तशी रोटी अशा म्हणी व वाक्यप्रचार आढळतात. या वापरामुळे विशिष्ट प्रादेशिक व-हाडी लोकजीवनाचे व व त्यातील समाजमनाचे दर्शन घडते.

कौतिक - " खेडूनि माडूनि आला गोपीचंद
पायना करा रुंद - त्याला पायन्याला छंद"
असे व-हाडी लोक गीत ती यशोदीचा पाळणा

हालवतांना म्हणते. तर महादेव विचित्र मानसिक अवस्थेत असतांना आपल्याशीच बरळरयचा,

" आस की मा,
निरास का बाप,
होती को बहेन,
निदान का दोस "

कौतिक वेडी झाल्यानंतर ती बडबडते " अन्खीन बाराक मैने त काम करतोच लेकाले...एक डाव् का नामा धंद्यापान्यीले लागला का माहे गंगेत घोडे न्हाले...

कासम-सकीना यांच्या संवादात हिंदी शब्द येतात, केंव्हा केंव्हा सकीना हिंदी बोलते आणि आणि नामा सरळ व-हाडीतून तिच्याशी संवाद करतो. उदा. " हमारा कैना ऐसा है की तू एखांदी नोकरी कर ले." नामा बोललाच नाही.

" क्या बोलती ।"

" पन नोकरी कोन्ती करु, वावरातलं काम त मले जीवावर येतओ ।"

" खेतीकी नई तो नई, एखादे होटल में पकड ले अभी की..."

" कफबशाा धुवाचो "

" फिर क्या हुआ, पेटके लिए कोन्ताभी धंदा करने मे कायकी लाज है ।"

भीमा सर्कशीत जातो, तेंव्हा तिथली हिंदी मिश्रित मराठी भाषा बोलतो. सर्वच भाषा विदर्भातील बोलीची असतो तरी पात्रानुकूल पात्राच्या स्वभावानुकूल भाषा वापरण्याचे कसब शेळकेंच्या लेखणीत आहे.

प्रादेशिक बोली हा त्या प्रदेशातील लोकजीवनाचा एक भाग असतो. व-हाडी बोली भाषा ही " धग " मध्ये लोकजीवनाचा एक भाग म्हणूनच येते. मनात येईल ते बोलावे, आडपडदा ठेवू नये असा इथल्या माणसांचा स्वभाव आहे. भीमा कौतिकला इतके दिवस कुठे होता असे विचारतो.

" बाप्पा मोठा गोस्टमॅच झाला रे। इतके दिवस कुठी होता "

" भौत घुमा, अमरावती, वर्धा-नागपूर"

" आन् पैसा रे "

" पैसे कायकू होना "

" गाडी मोटारवाले कौन तुहे बाप होते का " कौतिक त्याच्याशी कौतुकानं बोलू लागली, " का माहे "

" असन तुहे, ध्या हिंगनघाटवालीचे नौरे"

" चाल हलालखोरा, माइया माचव नाव नाको घेऊ, ये जेवाले "

या संवादात प्रथम येथील भाषा खडबडीत वाटते. कांही मोजक्या शिव्यांचा आहेर हो या व-हाडी बोलीभाषेत आहे. त्यामुळे प्रादेशिकता उठून दिसते. प्रादेशिक कादंबरी-मध्ये बोली भाषा हे वैशिष्टये ठरते. " धग " मधील ग्रामीण अनुभवविश्वाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे कादंबरीची भाषा व-हाडी बोली आहे ही भाषा व-हाडी प्रादेशिकतेचे रंग खुलविते.

## समारोप

या प्रकरणात प्रादेशिकता म्हणजे काय याचा विचार करुन प्रादेशिकता-ग्रामीणता या वादाबद्दल समीक्षकांची मते अभ्यासली. प्रादेशिकतेच्या घटकांचो माहिती घेतली. त्यानंतर भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, परंपरा, सामूहिकता, लोक संस्कृती आणि चालीरितो, भाषा इ.च्या आधारे " धग " मधील प्रादेशिकता अभ्यासण्याचा प्रयत्न केला.

" धग " या कादंबरीला प्रादेशिकतेचो भक्कम बैठक लाभलेली आहे. जुने पर्व संपून नव्या वळणाच्या प्रादेशिक कादंबरोला " धग " पासून प्रारंभ झाला. साहित्यात न वापरलेली भाषा, साहित्यात कधी ही न आलेली माणसे, न पाहिलेले जीवन वास्तव पातळीवर " धग " मध्ये चित्रित

झाले आहे. ही कादंबरी मैलाचा दगड ठरली प्रचलित रचनातंत्र झुगारुन तीने नवे रचनातंत्र स्वीकारले म्हणूनच पुढील प्रकरणात " धग " या कादंबरोची रचना अभ्यासू.

# प्रकरण तिसरे

## संदर्भसूची


१. यादव, आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
आवृत्ती पहिली, पृ. क्र. ६२/६३

२. तत्रैव : पृ. क्र. ६६/६७

३. कोत्तापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध.
मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.
आवृत्ती पहिली १९८५
पृ. क्र.१५

४. जोगळेकर गं.ना : महाराष्ट्र साहित्य पत्रिका
( ग्रामीण साहित्य विशेषांक)
उ. नि. पृ.क्र. ४५-५५

५. वडेर प्रल्हाद : आशय आणि आविष्कार,
मेहता पब्लिशिंग हाऊस
पुणे.आवृत्ती पहिली १९८८, पृ.क्र. २७

६. यादव, आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या.
तत्रैव, पृ.क्र. ७८

७. बांदिवडेकर चंद्रकांत: महाराष्ट्र साहित्य पत्रिका
( ग्रामीण साहित्य विशेषांक)
तत्रैव, पृ. १३३

८. कुलकर्णी द. भि. : तिस-यांदा रणांगण, पृ.क्र. १२

९. फडके, ना. सी. : प्रतिभा विलास, पृ.क्र. २०५

१०. पाटील, म.सू. : अक्षर वाटा, पृ. क्र . २४

११. जोगळेकर गं.ना. : म. सा. प. ( ग्रामीण साहित्य विशेषांक ) जून १९८० पृ. क्र. ५४-५५

१२. मंचरकर र.बा. : तत्रैव, पृ. क्र. ८४

१३. बांदिवडेकर चंद्रकात : महाराष्ट्र साहित्य पत्रिका ( ग्रामीण साहित्य विशेषांक ) तत्रैव, पृ. १२५

१४. गाडगोळ स.रा. : प्रतिष्ठान, फेब्रुवारी ते एप्रिल १९६४ पृ. क्र. ५४-५५

१५. फडके ना. सी. : प्रतिभा विलास, पृ.क्र. २०५